वि.दि.दावा.क्र. ०५/२०२५
निखील वि. सुमित्राबाई
निशाणी क्र.४३

वादीतर्फे साक्षीदार क्र.१ निखील सोनारे -
मी शपथेवर सांगतो की,

साक्षीदाराचा सर तपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. बांते यांच्यातर्फे सुरु-

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला वाचुन दाखविण्यात आला आणि मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला. त्यावर माझी सही आहे.

२. मी माझ्या पुराव्याकामी, दावा मिळकतीचे सातबारा उतारे, विविध खरेदीपत्रांच्या प्रमाणीत प्रती इत्यादी दाखल केलेल्या आहेत. सदर दस्तांना अनुक्रमे नि.क्र.४६ ते ६० देण्यात येत आहेत.

सरतपास पुर्ण.

साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते ५ करिता सुविद्य विधीज्ञ श्री. येरपुडे यांद्वारे -
नाकारला.

साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादी ६ ते ९ करिता -
प्रतिवादीं व त्यांचे वकील गैरहजर.
सबब, उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI
L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2026.02.17 17:13:54 +0530

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

दिनांक १७.०२.२०२६.
रामटेक

वि.दि.दावा.क्र. ६५/२०२५
चंद्रकांत वि. मनोहर
निशाणी क्र.४५

वादीतर्फे साक्षीदार क्र. २ सतिष पांडुरंग हेडाउ -
मी शपथेवर सांगतो की,

साक्षीदाराचा सर तपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ  एस.बी.नगरारे यांच्यातर्फे सुरु-

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला वाचुन दाखविण्यात आला आणि मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला. त्यावर माझी सही आहे.

२. करारनामा माझ्यासमक्ष करण्यात आला. करारावर मी साक्षीदार म्हणुन सही केली आहे. माझ्या समक्ष प्रतिवादीला माझ्यासमक्ष नगदी रक्कम रु.३ लाख तसेच एक लाखाचे तीन तसेच दोन लाखाचा एक असे एकुण चार धनादेश देण्यात आले होते. खरेदी पत्र करण्याची मुदत एक वर्षाची होती. प्रतिवादीने खरेदीपत्र करुन देण्यास नकार दिल्याने खरेदीपत्र झाले नाही.

सरतपास पुर्ण.

साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादी करिता -

प्रतिवादी व त्यांचे वकील गैरहजर.

सबब, उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

दिनांक ४.०२.२०२६.
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. khobragade (Gr.-II)